# महाराष्ट्र विकास केंद्र

**MAHARASHTRA VIKAS KENDRA**

Regn. No. MAH/535-2000(PUNE)Dt. 08 /05 /2000


दि. १०.६.२००८

प्रति,

**मा. प्रा. विजय नवले**

पुणे

महोदय,

महाराष्ट्र विकास केंद्राच्यावतीने टेंभुर्णी तालुका माढा येथे ग्रामीण भागामध्ये आयोजित केलेल्या करिअर फेअर २००८ या उपक्रमाच्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आपण उपस्थित राहिलात व आपला बहुमोल वेळ दिलात याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. तसेच सहभागी झालेल्या युवा वर्गास मार्गदर्शन केले व शैक्षणिक संधीची माहिती करून दिली याबद्दलही आपले आभार मानतो.

ग्रामीण भागात शैक्षणिक संधीची माहिती करुन देण्याच्या दृष्टीने घेतलेल्या या पहिल्याच उपक्रमास युवा वर्गाचा मोठा प्रतिसाद मिळाला. विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती त्यांच्यापर्यंत योग्यरित्या पोहोचवण्यात आपल्या सहकार्याने आम्हास यश मिळाले याबद्दल आम्हाला आनंद वाटतो.

भविष्य काळातही आम्ही ग्रामीण विभागासाठी उपयुक्त असे उपक्रम घेणार आहोत. अशा समाजोपयोगी उपक्रमास आपले सहकार्य राहील अशी खात्री आहे.

पुनश्च एकवार आभार.

कळावे,

आपला नम्र

**(अनिल पाटील)**

अध्यक्ष


Block No. 8A, Building No. 5, Siddheshwar Nagar,Tingre Nagar Road, Vishrantwadi, Pune - 411 015 (INDIA)
Contact : Mobile : 9822860487 , Email : mvkpindia@yahoo.co.in, Web Site : www.mvkindia.org